व्हिडीऑ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून खा. डॉ. नाईक यांचा नागरिकांशी संपर्क

ठाणे । प्रतिनिधी

व्हिडीओ कॉन्फरंसिंगच्या माध्यमातून जनसंपर्क साधण्याच्या खासदार डॉ. संजीव नाईक यांच्या अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मंगळवारी ठाणे येथील जनसंपर्क कार्यालयात दिल्ली येथून खा. डॉ. संजीव नाईक यांनी नागरिकांच्या समस्या जाणुन घेतल्या.

'खासदार आपल्या दारी' या यशस्वी अभियानानंतर नागरीकांच्या समस्या केव्हाही आणि कोठेही जाणून घेता ठाण्याततसेच सतत संपर्कात राहण्यासाठी डॉ. संजीव नाईक यांनी व्हिडीओ कॉन्फरंसिगच्या माध्यमातून संपर्क साधण्याच्या अभियानाला सुरूवात केली आहे. नागरिकांशी प्रत्यक्ष संपर्क साधताना वेळेअभावी संपर्क साधता येत नाही मात्र डॉ. संजीव नाईक यांनी सुरू केलेल्या या अभियानाला नागरिकांचाही तेवढाच प्रतिसाद मिळत आहे. मंगळवारी ठाणे येथील जनसंपर्क कार्यालयामध्ये नागरिकांनी नाईक यांच्याशी व्हिडीऑ कॉन्फरंसिगच्या माध्यमातून संपर्क साधला. नागरिकांनाही मोठ्या प्रभावात यावेळी निवेदने सादर केली. अनेक सुशिक्षत तरुनही या अभियानात जोडले गेले आहेत. खासदार संजय पाटील यांनीही ठाणेकर नागरीकांशी यावेळी संपर्क साधला. नागरिकांनाही व्हिडीओ कॉन्फरंसिगच्या माध्यमातून संपर्क साधण्याचे आवाहन डॉ. संजीव नाईकय यांनी केले आहे.